# “मैत्री” कडून मेळघाटात ‘दिवाळी आनंदमेळावा शिबिर’
# (१६ ते १९ नोव्हेंबर २०१५ )

‘मैत्री’ संस्थेमार्फत १६ ते १९ नोव्हेंबर २०१५ असे चार दिवस मेळघाटातील कोरकू आदिवासी मुलांकरता ‘दिवाळी आनंदमेळावा शिबिर’ झाले. चिलाटी आणि सलिता अशा दोन गावी शिबिर ठेवले होते. प्रत्येक ठिकाणी सकाळी १० वाजता आजूबाजूच्या ५/६ गावांमधून साधारण १०० मुले मुली त्यांच्या गावमित्राबरोबर जमा व्हायची. हे गावमित्र म्हणजे ‘मैत्री’चे मेळघाटातील स्थानिक कार्यकर्ते. प्रार्थना घेऊन शिबिराला सुरुवात व्हायची. काही थोडे व्यायाम प्रकार, ॐकार घेऊन सकाळचा नाश्ता करायला सगळ्यांना बसवायचे. पोहे, उपमा, उसळ, शिरा यापैकी रोज एक काहीतरी असा पोटभरीचा नाश्ता खाऊन मग सत्र सुरु करायचे.

सकाळच्या वेळात थोडा अभ्यास घ्यायचा असे ठरले होते अर्थात अभ्यास पण खेळांमधून किंवा काही आकर्षक वाटतील अशा साधनांमधून. जसे चित्र-शब्द पत्ते, आकार जोडणीचा खेळ (टॅंग्रॅम सारखा) वापरुन मोजणी, वर्गीकरण, रंग, आकार याचा अभ्यास, चित्र काढायला देऊन त्याचे वर्णन करायला सांगणे, त्यातून नवीन शब्द, वाक्ये शिकवणे अशा प्रकारे सकाळी अभ्यास करायचा. आकार जोडणीच्या खेळामध्येही काही मुलांमध्ये ‘दृष्य आकलन क्षमता’ (Visual intelligence) विशेष विकसित आहे हे जाणवत होते.
सुमारे एक तासाचे एक सत्र असे ठरवले होते. दोन सत्रांमध्ये गाणी, गंमत खेळ घेतले तरच मुलांचा उत्साह टिकतो. इथल्या मुलांना गाणी म्हणायला खूप आवडते. ‘निले आकाश में, चंद्र प्रकाश में’, ‘म्हातारीची शेती होती’ ही गावमित्रांनी शिकवलेली गाणी मुले मस्त साभिनय म्हणायची. आम्ही पण त्यांना ‘फुलांवर उडती फुलपाखरे’, ‘अट्टू आणि गट्टू फिरायला चालले’, ‘चिमणाचिमणीचं लगीन’, ‘कोणास ठाऊक कसा पण शाळेत गेला ससा’ ही गाणी शिकवली. त्यातल्या ‘अट्टू गट्टू’ च्या गाण्यावर सगळे बेहद्द खूष होते. ‘चकरक चकरक’ ही आम्ही शिकवलेली आरोळी पण खड्या आवाजात व्हायची.

जेवणानंतरच्या सत्रांमध्ये विविध सर्जनशील कृती आम्ही ठरवल्या होत्या. फुलपाखराच्या गाण्याला जोडून कागदी फुलपाखरु करायला शिकवले मुलांना. नंतर रंगवून, टिकल्या लावून ते सजवायचे होते. ही कृती मुलांना फारच आवडली. आपापली फुलपाखरे हातात घेऊन गाणे म्हणण्याचा आनंद वेगळाच होता. वारली चित्र काढणे, अंगठ्याच्या ठशांपासून चित्र काढणे या कृतींमध्ये मुले अगदी रंगून गेली. वारली चित्राचा नमुना मुलांना दाखवला होता. त्यात आणि इतर चित्रात कसा फरक आहे हे समजावून सांगितले. भाषा सगळी कळली नसली तरी आशय मुलांना कळला हे त्यांनी काढलेल्या चित्रांवरुन समजत होते. काहींना खूप प्रयत्न करावा लागला पण काहींनी पहिल्या झटक्यात छानच जमले. पेन्सिल न वापरता थेट रंगाने काढणे हे पण एक आव्हान होते. लहान मुलांना चित्र काढणे जमत नव्हते तेव्हा एकीने सांगितले ‘ये लिखना नहीं आता’. मग तिला आणि इतरही छोट्यांना बाह्यरेखा काढून दिल्यावर अगदी नीटसपणे त्यांनी रंग भरले.

‘चिमणाचिमणीचं लगीन’ या गाण्यावर आम्ही ‘कठपुतळीचा खेळ’ (पपेट शो) करायचे ठरवले होते. गाण्यातल्या प्राणी पक्ष्यांची चित्रे आम्ही पुण्यामधून काढून नेली होती. त्याला तिथल्याच ज्वारीच्या धाटांच्या काठ्या लावून स्टिक पपेट बनवली आणि शेवटच्या दिवशी चिलाटीमध्ये ‘पपेट शो’ दाखवला.

सलितामध्ये मुलांनी स्वत:च हातात स्टिक पपेट धरुन गाणे म्हटले आणि नंतर वरात पण काढली. कागदाची मोठी झाडे बनवून भिंतीवर लावणे हे गटकाम एका दिवशी होते. लहान लहान पक्षी जाड कागदावर काढून, रंगवून, कापून या झाडांवर चिकटवायचे गटकार्य होते. पक्ष्यांनी, फुलांनी, फळांनी झाडे भरुन गेली. चिमणी, कावळा, पोपट, ससाणा इ. अगदी गुण्यागोविंदाने एकाच फांदीवर बसून गात होते. इतकेच काय पण तळ्यासकट बदक पण झाडावर जाऊन पोहोचले होते. एकाच झाडावर आंब्याबरोबर पेरु सुद्धा लागले होते. smile emoticon

नेमून दिलेल्या व ठरवलेल्या कृतींशिवाय स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे काही अधिक गोष्टी पण घेतल्या. जसे 'नाव वल्हवा' चे गाणे, कागदाची टोपी, वेगळ्या प्रकारचे फुलपाखरु, सोपी कागदी फुले, जरा निराळी होडी, लिंबाच्या रसाने लिहिलेला गुप्त संदेश, संपलेल्या बॉलपेनाचा हातपंप करुन पाणी वर काढणे, दृष्टीभ्रमाची चित्रे इत्यादी.

शिबिराचे चार दिवस कसे सरले कळले नाही. एखादे कार्य पार पडले की येतो ना तसा एक 'रितेपणा' आला शिबिर संपल्यावर. पण मग एकेक आठवणी वर येऊ लागल्या - शिबिरातील विविध कृती, त्याची तयारी, ते गाण्यांचे आवाज, वेगळ्या भाषेमुळे होणा-या गंमतीजंमती, एखादी कृती ठरलेल्या वेळाच्या आधी संपली तर आयत्यावेळी प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकाराने लढवलेला किल्ला, एखादी कृती ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ चालली तर फेरनियोजन अशा सगळ्या गोष्टी आठवल्या आणि पुन्हा एकदा नवा उत्साह, नवी उमेद मनात भरुन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

सर्व स्वयंसेवकांनी अतिशय तळमळीने बहुरंगी, बहुढंगी कामे उत्साहाने केली. त्यांना गावमित्रांनी व स्थानिक कार्यकर्त्यांनी लागेल ती मदत केली आणि म्हणूनच हे शिबिर यशस्वीपणे पार पडले. या सर्वांचेच खूप खूप अभिनंदन. या शिबिरासाठी आर्थिक मदत देणारे,धान्य/ शिधा देणारे तसेच विविध साहित्य/ वस्तू देणारे असंख्य मित्र मैत्रिणी व स्नेही आहेत. त्या सर्वांना पण मन:पूर्वक धन्यवाद !

- अश्विनी धर्माधिकारी

---

***** यावेळचा शिबिरासाठीचा 'मैत्री' गट *****

शिबिर कार्यक्रम आखणी – मी व शोभाताई केळकर

स्वयंसेवक : माझा मुलगा मल्हार व पुण्यातील अक्षरनंदन शाळेतील आठवीचे त्याचे मित्र मैत्रिणी (हर्ष कहाते, आर्य हरताळकर, ज्ञानेश मेणसे, कौशिक केळकर, स्वराली घांगुर्डे, सानिया कर्णिक), तिसरीतील अर्णव कर्णिक आणि काही पालक (हर्षा हरताळकर, प्रतिभा मेणसे, स्वप्नगंधा घांगुर्डे, तृप्ती कर्णिक). शिवाय मुंबईतून भक्ती मोकल

मेळघाटामधील 'मैत्री' चे कार्यकर्ते – रामेश्वर फड, अशोक धिकार, रमेश मावस्कर, दिलीप, राजाराम, कालू बेठेकर, बाबुलाल, कुंजीलाल

गावमित्र - रतनाय व विलास (सिमोरी), सोमजी (कुही), नीलेश(रुईपठार), किशोर(मारिता), शंकर व लक्ष्मी(करंजखेडा), गेंदालाल(सलिता), सोनाजी(सुमिता), परसराम(भांड्डम), कविता(चिलाटी)

सहाय्यक – लीनता वैद्य, तुषार, कुलकर्णी काका, 'मैत्री' विश्वस्त, इतर 'मैत्री' सहकारी आणि सर्व देणगीदार व हितचिंतक